# कागदी लिंबूचे फायदेशीर व्यवस्थापन

लिंबूवर्गीय फळातील कागदी लिंबू हे संत्रा व मोसंबीनंतर तिसऱ्या क्रमांकाचे फळ आहे. लिंबूमध्ये 'क' जीवनसत्व भरपूर प्रमाणात असल्यामूळे, नियमीत आहारात सेवन केल्यास रोग प्रतिकार शक्ती वाढून डोळयाचे, पोटाचे आजार नाहीसे होतात.

**जमीन :**

सर्वसाधारण मध्यम काळी, दीड ते दोन मीटर खोल, उत्तम निचरा होणारी आणि चुनखडी विरहीत, क्षार ०.५० डेसीसा /मी पेक्षा कमी, ६.५ ते ८ सामू व चुन्याचे प्रमाण १० टक्के कमी असलेली जमीन लिंबू पिकांस योग्य आहे. जास्त खोल, भारी व चोपन जमिनीत पाण्याचा निचरा न झाल्यामूळे रोपे मूळकुज, पायकूज, डिंक्या सारख्या रोगांना हमखास बडी पडतात.

**सुधारित जाती :**

१) **साईसरबती** : राहुरी कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले हे वाण आकाराने अंडाकृति, ५० ग्रॅम वजनाचे, पातळ साल, चमकदार, पिवळया रंगाचे, रसाचे प्रमाण ५४.५१ टक्के, बियाचे प्रमाण कमी, कँकर आणि ट्रिस्टेझा या रोगास सहनशील आहे.

२) फुले सरबती: राहुरी कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल हा वाण आकाराने गोलाकार , तिस-या वर्षापासून उत्पादन सुरु, तुलनेनी जास्त उन्हाळी पिक, पातळ सालीचे, रसाचे प्रमाण ५२.५२ टक्के,जोमदार झाडांची वाढ आणि रोग व किडीस जादा सहनशील.

**लागवड** :- ६ x ६ मी अंतरावर, १ x १ x १ मी आकाराचे खड्डे करावेत. खड्ड्या मध्ये शेणखत ४ ते ५ घमेले, सिंगल सुपर फास्फेट ०२ किलो, निंबोळी पेंड ०१ किलो व ट्रायकोडर्मा २५ ग्रॅम मिसळावे व लागवड करावी.

**खत व्यवस्थापन :-**

लिंबूची मुळे ४५ ते ६० सें.मी.खोल जात असल्यामुळे खताची मात्रा ६० ते १०० सें.मी. मुख्य खोडापासून दूर १५ ते २५ सें.मी.रुंद व १५ ते २० सें.मी.खोल चर खोदून द्यावीत.चौथ्या वर्षानंतर वरील खतांशिवाय ५०० ग्रॅम व्हॅम + १०० ग्रॅम पिएसबी जिवाणू + १०० ग्रॅम अॅझोस्पिरिलम व १०० ग्रॅम टायकोडर्मा हरजियानम द्यावे. सुक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता आढळल्यास ०.५ टक्के झिंक सल्फेट, ०.५ टक्के मॅग्नेशियम सल्फेट, ०.५ टक्के मॅग्नीज सल्फेट आणि ०.३ टक्के फेरस सल्फेट व कॉपर सल्फेट या सुक्ष्म अन्नद्रव्याची फवारणी करावी.

| झाडाचे वय वर्षे | खतांची मात्रा प्रति झाड | | |
|---|---|---|---|
| | जून | सप्टेंबर | जानेवारी |
| १ | लागवडीच्या वेळी शेणखत १० किलो, सिंगल सुपर फास्फेट ०२ किलो, निंबोळी पेंड ०१ किलो व ट्रायकोडर्मा २५ ग्रॅम | ५० ग्रॅम नत्र | ५० ग्रॅम नत्र |
| २ | शेणखत १५ किलो, निंबोळी पेंड ०२ किलो व १०० ग्रॅम नत्र | ५० ग्रॅम नत्र | ५० ग्रॅम नत्र |
| ३ | शेणखत १५ किलो, सुफला ०१ किलो व निंबोळी पेंड ०२ किलो | १०० ग्रॅम नत्र | १०० ग्रॅम नत्र |
| ४ | शेणखत १५ किलो, सुफला ०२ किलो, म्युरेट ऑफ पोटॅश ५०० ग्रॅम व निंबोळी पेंड १५ किलो | १५० ग्रॅम नत्र | १५० ग्रॅम नत्र |

**लागवडीनंतरची काळजी :-**

झाड जोमदार बनविण्याकरीता झाडांना वळण देणे आवश्यक आहे. मुख्य खोड जमिनीपासून ७५ ते १०० से.मी. पर्यंत सरळ वाढू द्यावे. जमिनीलगतचे पाणसोट व खोडावर आलेली फुट सतत काढत रहावी. दाट झालेल्या, रोगट किंवा पाणसोट फांद्या काढून झाडाला डौलदार आकार द्यावा. छाटणी केलेल्या जखमेवर ताबडतोब बोर्डोपेस्ट लावावी. सुरवातीच्या काळात छाटणी कमी करावी अन्यथा झाडे फुलाफळावर येण्यास अधिक वेळ लागतो.कागदी लिंबूच्या जुन्या बागेपासून उत्तम प्रतीचे उत्पादन मिळविण्याकरीता जून महिन्याच्या पहिल्या आठवडयात फांद्याची मध्यम छाटणी (२५ ते ४५ से.मी. शेंडयापासून खाली) करावी.

**आंतरपिके :-**

सुरवातीच्या ३-४ वर्षापर्यत भुईमुग, श्रावण घेवडा, मुग, उडीद, कांदा, कोबी आणि मेथी ही आंतरपिके घ्यावीत. ही पिके सर्वसाधारणपणे ९० ते ११० सें.मी.अंतर सोडून दोन ओळीमधल्या पट्टीत घ्यावीत

**पाणी देण्याची पध्दत :-**

लिंबाची मुख्यमुळे साधारण ६० सें.मी. खोली पर्यंत जात असल्यामुळे उन्हाळयात ७ ते १० दिवसांनी व हिवाळयात १५ ते २० दिवसांनी पाणी द्यावे. पाणी झाडाच्या बुध्यांला लागू देऊ नये, अन्यथा मूळकूज व पायकूज हे रोग होण्याची दाट शक्यता असते. म्हणून झाडांना पाणी देतांना बांगडी पध्दतीने पाणी द्यावे

## हस्त बहार व्यवस्थापन:

लिबूंच्या फळांना नेहमी उन्हाळयात भरपूर मागणी असल्यामुळे, चांगला भाव मिळतो. पाण्याचा नियमित पुरवठा असल्यास उन्हाळयात फळे मिळतील या हेतूने हस्त बाहर घ्यावा. हस्त बहार घेण्यासाठी कागदी लिंबूच्या झाडाला सप्टेंबरचा दुसरा आठवडा ते ऑक्टोबरच्या दुसरा आठवडा या एक महिन्याच्या कालावधीत पाण्याचा ताण द्यावा लागतो पण बरेच वेळेस या कालावधीत पाऊस असल्यामूळे ताण बसत नाही व ताण दिल्यास अगोदरच्या बहाराची फळे अपक्व स्थितीतच गळून जाण्याचा धोका संभवतो. याकारणास्तव महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी ने हस्त बहार घेण्यासाठी खालील शिफारीश केले आहे.

कागदी लिंबूच्या हस्त बहारातील अधिक उत्पदनासाठी जून महिन्यात जिब्रेलिक ॲसीड (जी.अे.-३) ५० पीपीएम,सप्टेंबर महिन्यात सायकोसील १००० पीपीएम संजिवकाची व ऑक्टोबर महिन्यात १ टक्का पोटॅशियम नायटेट द्रावणाची फवारणी करावी.

## रोग नियंत्रण :

**कॅंकर/खैऱ्या:** रोगग्रस्त फाद्यांची छाटणी करावी. स्ट्रेप्टोसायक्लीन ०१ ग्रॅम अधिक कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्राम प्रती दहा लिटर पाण्यातुन फवारावे.

**उत्पादन :-** पुर्ण वाढलेल्या एका कागदी लिंबु झाडापासून २५०० ते ३००० लिंबू प्रत्येक वर्षी मिळू शकतात

# कागदी लिंबूचे फायदेशीर व्यवस्थापन


* संपादक *

**डॉ.किरण कोकाटे**

संचालक विस्तार शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

* मार्गदर्शक *

**डॉ.लाखन सिंग**

संचालक : अटारी, पुणे

* प्रकाशक *

**प्रा.मोहन शिर्के**

कार्यक्रम समन्वयक

कृषि विज्ञान केंद्र, बोरगांव

* लेखक व संकलक *

**प्रा.भूषण यादगीरवार**

विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या)

**डॉ.महेश बाबर**

विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार)

**श्री.संग्राम पाटील**

कार्यक्रम सहाय्यक

**प्रा.सागर सकटे**

विषय विशेषज्ञ (पशुसंवर्धन)

* संपर्क *

**कृषि विज्ञान केंद्र**

बोरगांव, ता.जि.सातारा

02162-265228

Email - kvkborgaon_satara@yahoo.com

Website : kvkbsatara.org



कृ.वि.के.बोरगांव/प्रकाशन/०४/२०१८


भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर

# कागदी लिंबूचे फायदेशीर व्यवस्थापन



भाकृअनुप ICAR

**कृषि विज्ञान केंद्र**

बोरगांव, ता.जि.सातारा